Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 80 – 84
DOI: 10.5281/zenodo.10072529

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना

प्रा. डॉ. एकनाथ वैजनाथ भिंगोले

मराठी विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड ४३१७१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: eknathbhingole@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

धर्म, नीती, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती असे कोणतेही क्षेत्र असो गावापासून विश्वापर्यंत प्रचंड मोठा आवाका गांधी विचाराने व्यापला आहे. मानवावर प्रभाव टाकणाऱ्या सर्व प्रक्रियांचे सुक्ष्म निरीक्षण करून त्यांचे मूलगामी चिंतन गांधीजींनी केले होते. या अनुषंगाने वरील विषयांच्या संदर्भात शोध आणि बोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रामस्वराज्याची व्याख्या करताना महात्मा गांधी म्हणतात की, लोकांच्या संमतीने होणारे भारत वर्षातील शासन. लोकांच्या संमतीने हे शासन देशवासीयांच्या मताधिकारांच्या प्रयोगावर आधारित असेल.

आज ज्या पद्धतीने भारतातील खेड्यांची दुरावस्था झालेली आहे. तुलनात्मकदृष्ट्या प्राचीन काळातील खेड्यात परिस्थिती खूप चांगली होती. खेड्यातील लोकांचे जीवन सुखी व समृद्ध होते. ग्रामीण समुदाय स्वावलंबी जीवन जगत होता. प्रत्येक खेड्याने स्वत:ची मजबूत व्यवस्था उभी केलेली होती. पंचायत ही खेड्यात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली एक संस्था असून तत्कालीन प्रत्येक खेडेगाव हे गणराज्य होते. ग्रामीण भागातील उद्योग चांगले चालत असत. खेडी स्वयंपूर्ण व स्वयंशासित बनलेली होती. गांधीजीच्या या काळाला ग्रामगणराज्यांचा सुवर्णकाळ मानले होते.

भारतात ब्रिटिश साम्राज्यामुळे पाश्चिमात्यकरणाच्या प्रक्रियेस सुरूवात झाली. साम्राज्यवादी शासनाने आर्थिक शोषणाची व्यवस्था खेडेगावांपर्यंत पक्की केली. अर्थसत्ता व राजकीय सत्तेचे शहरात केंद्रीकरण केले. परिणामी विक्रेंदीकरणावर आधारित असणाऱ्या ग्रामव्यवस्थेला सुरूवात झाली. पाश्यिमात्यकरणामुळे भारतात उभ्या राहिलेल्या शहरांनी खेड्यांचे शोषण करणे सुरू केले. स्वावलंबी असणारी खेडी परावलंबी बनवली व त्यामुळे ग्रामीण जीवनाला

उतरती कळा लागली. गांधीजींच्या म्हणण्यानुसार भारत हा खेड्यांचा देश आहे आणि जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही.

**महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्यांची संकल्पना**

महात्मा गांधीजींच्या अर्थशास्त्राचा ग्रामस्वराज्य आणि स्वावलंबन हा गाभा होती. महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची अशी कल्पना होती की, जिथे स्वावलंबी समाज असेल आणि आपल्या उपजिविकेसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहणार नाही तर तो परस्परांच्या सहकार्याने काम करेल. गांधीजींना अन्न, वस्त्र व निवारा या बाबतीत स्वंयपूर्णता अपेक्षित होती.

प्राचीन भारतातील खेडी स्वंयपूर्ण होती. स्वयंपूर्ण खेड्यांत उत्पन्न, उपभोग, वितरण प्रक्रिया एकाचवेळी घडाव्यात. उद्योगाचे विकेंद्रीकरण व्हावे असे गांधीजींना अपेक्षित होते. खेडे हा विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही, असे गांधीजींचे मत होते. भारताच्या विकासासाठी त्यांनी ग्राम विकासावर भर दिला व ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडली. या संकल्पनेअंतर्गत श्रमप्रतिष्ठा, स्वयंपूर्णता, विकेंद्रीकरण, ग्रामीण व्यवसाय शिक्षण, प्रौठ साक्षरता, सहकारी शेती, अस्पृश्यता निवारण, स्त्री सक्षमीकरण, आर्थिक समता या तत्त्वांवर भर दिला.

ग्रामीण भागात असणाऱ्या विविध समस्या जसे- आरोग्य, दारिद्रय, निरक्षरता इत्यादी समस्या सोडविल्यास खेड्यांचे पुनरूज्जीवन होईल असा विश्वास गांधीजींना होता. गांधीजींच्या मते, खेडे हा घटक खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण होण्यासाठी त्या खेड्यातील प्रत्येक व्यक्तीने प्रशासनात भाग घेतला पाहिजे. ग्राम स्वराज्याच्या संकल्पनेत गांधीजींनी आदर्श खेड्याची रचना केली. प्रत्येक खेड्यात पाणी पुरवठ्याच्या सोयी, गुरांसाठी गोठे, खेळाची मैदाने, सांडपाण्याची व्यवस्था, प्राथमिक शिक्षण अनिवार्य असावे. प्रशासनाचे काम पंचायतीकडे असावे. व्यक्तिच्या मूलभूत गरजा खेड्यातून भागाविल्या जाण्यात यासाठी खेडी स्वयंपूर्ण असावीत, अशी गांधीजींची धारणा होती.

**ग्रामस्वराज्याचे घटक**

गांधीजींचा प्रमुख उद्देश हा खेड्यांचा विकास होता. त्यासाठी त्यांनी रचना कार्यक्रमाची आखणी केली होती. रचनात्मक कार्यक्रमात ग्रामसफाई, अस्पृश्यता निवारण, श्रमप्रतिष्ठा, सहकारी शेती, जातीय ऐक्य, दारूबंदी, ग्रामोद्योग, ग्रामीण शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक समानता इत्यादींसाठी कल्याणकारी कार्यक्रमांचा समावेश होता. गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेत पुढील घटकांचा विचार करता येईल.

**१) ग्राम किंवा खेडे:** ग्राम हा सर्वात महत्वपूर्ण घटक असून गाव स्वावलंबी राहील. प्रत्येक गावासाठी एक पंचायत राहील. गांधीजी शक्तीच्या विकेंद्रीकरणाचे समर्थक होते. ग्रामपंचायत हा गावाचा कारभार पाहील. गावातील प्रत्येक व्यक्ती स्वावलंबी राहील. कोणत्याही व्यक्तीच्या मार्गात कोणीही अडचणी निर्माण करणार नाही. व्यक्ती हा केंद्रबिंदू राहील.

गावातील कायदेविभाग, शासनविभाग व न्यायविभाग या तिन्ही विभागाची सत्ता ग्रामपंचायतीकडे राहील. सत्तेचे विकेंद्रिकरण त्यांना मान्य आहे. राज्य हे साध्य नसून साधन आहे. राजकीय विक्रेंद्रिकरणासोबतच आर्थिक विकेंद्रिकरणावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

**२) श्रमप्रतिष्ठा:** प्रत्येकाने आपला व्यावहारिक जीवनचरितार्थ चालविण्याकरिता श्रम करणे आवश्यक आहे. श्रम कोणतेही असो ती सर्व कामे समाजासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे श्रम कोणत्याही प्रकारचे असोत त्याला समाजात प्रतिष्ठा मिळायला पाहिजे. गांधीजींनी श्रमसिद्धांताचे प्रतिपादन करून शारीरिक श्रमाला महत्त्व प्रदान केलेले आहे. त्यांच्या मते, शारीरिक श्रम केल्यास व्यक्तीला आरोग्य व समाधान लाभते.

**३) विकेंद्रीकरण:** विकेंद्रीकरण हा गांधीजींच्या ग्रामस्वराज्याचा मूलमंत्र होता. गांधीजींचा राजकीय व आर्थिक बाबतीत विकेंद्रीकरणावर भर होता. खेड्यांचे प्रशासन अधिकाधिक स्वयंपूर्ण असावे. राजकीय सत्ता ही साध्य नव्हे तर साधन आहे, असे गांधीजींचे मत होते. राजकीय विकेंद्रीकरणाबरोबरच गांधीजींनी आर्थिक विकेंद्रीकरणावर भर दिला. उत्पादन साधनाच्या केंद्रीकरणामुळे आर्थिक विषमता निर्माण होते म्हणूनच उद्योगाचे केंद्रीकरण गांधीजींना नको होते.

**४) कुटीरोद्योग व लघू उद्योगांना महत्त्व:** हस्तव्यवसाय व कुटीरोद्योग ग्रामीण बेकारी व दारिद्र्य नष्ट करतात. तसेच देशातील पैसा परदेशात जाणे बंद होते. आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण होण्यासाठी उद्योगांना त्यांनी प्राधान्य दिले आहे. गांधींनी खादी व चरखा यांना आपल्या कल्पनेत मध्यवर्ती स्थान दिले आहे. ते म्हणतात, चरखा हा ग्रामोद्योगातील मध्यबिंदू आहे. हस्तव्यवसायाच्या केंद्रस्थानी चरखा बसविला पाहिजे. शेतीतून निर्माण होणाऱ्या कापसापासून शेतीतील इतर कामे करीत असताना घरीच सूत कातून कापड विणून खादी तयार होवू शकतात. त्यामुळे शेतकरी रिकामा वेळ या कार्यात घालवू शकतो. त्यामुळे अर्धबेकारी नष्ट होऊ शकते. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होण्यास हातभार लागून खेडी स्वयंपूर्ण होऊ शकतील.

**५) सहकारी शेती:** खेड्यांमध्ये सहकारी तत्त्वावर शेती केली तर एकात्मतेची भावना निर्माण होऊन एकमेकांच्या सहकार्यातून भारत घडविण्याचे स्वप्न गांधीजींनी पाहिले. सहकारामुळे जो शेतकरी गरीब आहे, ज्याच्याकडे शेती करण्याचे साधन नाही त्याला मदत होईल. सहकारी शेतीमुळे देशात सहकार क्षेत्र वृद्धींगत होऊन सहकार्याचे वातावरण निर्माण होण्यास मदत मिळेल.

**६) अस्पृश्यता निवारण:** महात्मा गांधीजींना स्वराज्यापेक्षाही अस्पृश्यता निवारण ही गोष्ट जास्त महत्त्वाची वाटत होती. अस्पृश्यता वर्णाश्रमाच्या विरोधी आहे. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य आजन्म केले. ग्रामस्वराज्य निर्मितीसाठी अस्पृश्यता निवारण करणे आवश्यक आहे. गांधीजींनी अस्पृश्यतेला भारतीय समाजावरील कलंक म्हटले आहे. अस्पृश्यता ही समाजाला घातक असल्यामुळे भारतीय समाजाची मोठी हानी झाली आहे. याकरिता प्रत्येकाने अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस हीन लेखणे मानवतेच्या विरोधी आहे. गांधीजींनी अस्पृश्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम केले.

**७) शासनव्यवस्था:** मताधिकार हा शिक्षण किंवा संपत्तीचा आधार असू नये. तो श्रमाच्या आधारावर असावा. जनसेवा हीच प्रमुख अट त्यात असावी. प्रचारात प्रतिपक्षाची निंदा करू नये. गांधीजींनी सत्ता विकेंद्रीकरणावर जास्त भर दिला आहे. अस्पृश्यांना खास प्रतिनिधित्व असावे. खेड्यांचे मुख्य संघटन राहून खेडी ही जिल्ह्याकरिता आपली जिल्हा कारभार मंडळे निवडतील. जिल्हा मंडळे, प्रांतिक मंडळे व केंद्रीय मंडळे अध्यक्षांची निवड करतील. सर्वांचे अधिकतम सुख हे शासनाचे ध्येय राहील. संरक्षण व शांतता हे कार्य पार पाडताना पोलिसांचे कार्य संरक्षक स्वरुपाचे असावे. पोलीस व सैन्याचा कमीत कमी उपयोग करावा.

**८) ग्रामीण अर्थव्यवस्था:** ग्रामीण अर्थव्यवस्था अशी असावी जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजांची पुर्तता करता येईल. प्राथमिक गरजांची उत्पादन साधने सर्वसामान्य व्यक्तीच्या हातात असावीत. हवा, पाणी जसे सर्वांसाठी आवश्यक असते तसे उत्पादन साधने सर्वांसाठी आवश्यक आहेत. अन्नधान्य, फळे, भाजीपाला आणि खादी यांचे उत्पादन करील. उपलब्ध संसाधनाच्या आधारे वस्तूंचे उत्पादन करून आपल्या गरजांची पुर्तता करावी. अतिरिक्त वस्तुंची शहरांना निर्यात करावी.

**९) शिक्षणव्यवस्था:** ग्रामस्वराज्यात प्राथमिक शिक्षण विनामूल्य व सक्तीचे असले पाहिजे. अहिंसात्मक समाजव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय पुढे ठेवून त्यांना शिक्षण द्यावे आणि ते शिक्षण मातृभाषेतून असावे. जीवनपयोगी व शास्त्रशुद्ध पद्धतीने शिक्षण देण्यात यावे. विषयाचे ज्ञान करून देताना विश्वकुटुंब कल्पनेला प्राधान्य द्यावे. शारीरिक श्रम विद्यार्जनाशी संलग्न करून शारीरिक श्रमाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे. धंदेवाईक शिक्षणावर विशेष भर असावा. पुस्तकी शिक्षणापेक्षा कृतीपर शिक्षणाला त्यांनी जास्त महत्त्व दिले. विद्यार्थी स्वावलंबीन बनविण्याच्या हेतूने शिक्षण द्यावे.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीनी व्यक्ती विकासाला केंद्रबिंदू मानून गावाच्या विकासात व्यक्तीला प्राधान्य दिले.
२. महात्मा गांधीची ग्रामस्वराज्याची संकल्पना व्यक्तीच्या श्रमाला प्रतिष्ठा देणारी व खेड्यांना स्वावलंबी बनविण्यास सहाय्यक आहे.
३. भारत हा खेड्यांचा देश आहे. जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. जागतिक स्तरावर आपला ठसा कायम करायला असेल तर या देशातील खेड्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.
४. महात्मा गांधींची ग्रामस्वराज्याची संकल्पना आदर्श तत्त्वावर आधारित आहे.
५. खेड्यांच्या विकासासाठी ग्रामपंचायतींना दिलेले अधिकार, देशात सत्तेच्या विकेंद्रीकरणावर दिलेला भर, दारूबंदी करणे काळाची गरज तसेच ग्रामपंचायतीचे व ग्रामसभेचे वाढते महत्त्व पाहून गांधीजींचे विचार प्रत्यक्षात उतरल्याची जाणीव होते.

६. ग्रामस्वराज्याची संकल्पना यशस्वीतेसाठी खेड्यांना देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू मानून गांधीजींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली.

७. स्वराज्य या संकल्पनेला भारतामध्ये सर्वप्रथम गांधीजींनीच जनसामान्यांचा आणि लोकशाहीचा संदर्भ प्राप्त करून दिला.

८. महात्मा गांधीजींनी स्वच्छतेचा सरळ संबंध आरोग्याशी व समृद्धीशी जोडला आहे.

९. २००८ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय स्वच्छता वर्ष' म्हणून साजरे केले गेले.

१०. २ ऑक्टोबर २००० पासून मागणी व लोकसहभावर आधारित ग्रामस्वच्छता मोहिमेने वेग घेतलेला आढळतो.

११. सामाजिक विचाराच्या माध्यमातून देशात न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जोपासना करून ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

१२. ग्रामीण स्वराज्यात सर्व भारतीय समाज सुजलाम सुफलाम झाला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती.

**समारोप**

गांधीजींनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेच्या माध्यमातून खेड्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. 'खेड्याकडे चला' ही गांधीजींची घोषणा या संकल्पनेच्या माध्यमातून साध्य होताना दिसते. ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून खेड्यातील राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकास झाला पाहिजे तसेच खेड्यांतील लोकांचे आरोग्य निरोगी राहिले पाहिजे यासाठी स्वच्छतेवर त्यांनी भर दिला आहे. ग्रामीण जीवनाच्या विविध पैलूंवर त्यांनी विचार व्यक्त केले. खेड्यांचा विकास साधण्यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडली. एकंदरीत ग्रामीण लोकांच्या उत्कर्षासाठी आजच्या काळातसुद्धा ग्राम स्वराज्याची संकल्पना फार महत्त्वाची वाटते.

**संदर्भ सूची**


१. महात्मा गांधी, ग्रामस्वराज्य, अहमदाबाद : नवजीवन पब्लिशिंग हाऊस.

२. हट्टेकर विजय, गांधी विचार, नांदेड : निर्मल प्रकाशन

३. अग्रवाल गंगाप्रसाद, हिंद स्वराज्य मार्गदर्शक दस्ताऐवज, धुळे : साम्य योग साधना प्रकाशन, २००५

४. चोळकर पराग, गांधीजी जीवन और विकास, नागपूर : मंगेश प्रकाशन २००७

५. ग्रामस्वराज्य, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधी भवन, पुणे, १९९५

६. कराळे गंगाधर, ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन, नागपूर : मंगेश प्रकाशन, २००८

७. धर्माधिकारी भाऊ (संपादक), ग्रामस्वराज्य, कोथरूड, पुणे : महाराष्ट्र गांधी भवन, १९९५

८. भोळे भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स

९. मिश्र अनिल, गांधी के विचार, नई दिल्ली : प्रभात प्रकाशन, २००९